# परळीतील अग्निशमनची इमारत पंधरा वर्षांपासून धुळखात पडून


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

**आरंभ**

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564





■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २३७ ■ शुक्रवार दि.१६ मे २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 237 ■ Friday Dt.16 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# परळी नगरपरिषद प्रशासनाकडून शहरातील नागरी सुविधा व अत्यावश्यक बाबींकडे दुर्लक्ष?

## सुसज्ज इमारतीचा गैरवापर, सर्वच गाड्या नगरपरिषदेच्या इमारतीखाली?

### इमारतीचा तळीराम व रोड रोमिओंकडून गैरवापर; शासनाच्या पैशातुन उभारलेली ही इमारत नेमकी कशासाठी?

परळी । प्रतिनिधी

परळी व परिसरात घडलेली आपात्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी व घटनास्थळी जलदगतीने पोहचता यावे यासाठी परळी नगर पालिकेच्या अग्निशामक दलासाठी शासनाने २०१० साली उभारलेली सुसज्ज इमारत पंधरा वर्षापासुन धुळखात पडुन आहे. या इमारतीचा तळीराम व रोडरोमिओकडुन गैरवापर होताना दिसत आहे. न. प. अग्निशामक दलाच्या ८ गाड्या मात्र मुख्य इमारतीखाली लावाव्या लागत आहेत.

परळी नगरपालिकेकडे आठ सुसज्ज वाहनांचा ताफा असलेले अग्निशामक दल आहे. परंतु हा विभाग केवळ एका प्रशिक्षीत कर्मचार्यावर चालविला जात आहे. परळी नगर पालिकेने सन २०१० साली नंदागौळ रस्त्यावरील कचरा डेपोशेजारी ४० लाख रुपये खर्च करुन सुसज्ज इमारत उभी केली आहे. आपत्कालीन परिस्थितीत गाड्या तात्काळ बाहेर काढता याव्यात, सर्व साहित्य आणि कर्मचार्यांसाठी व्यवस्था या ठिकाणी अंतर्भूत आहे. सध्या परळी नगरपालिकेच्या अग्निशामक दलात लहान मोठी अशी आठ वाहने असली तरी सुनिल आदोडे हे विभागप्रमुख वगळता एकही प्रशिक्षीत व कायमस्वरूपी कर्मचारी नाही. यामुळे नंदागौळ रस्त्यावरील अग्निशामक दलाची ही इमारत पंधरा वर्षापासुन धुळखात पडुन आहे. अग्निशामक दलाची सर्व वाहने नगरपालिकेच्या मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ लावली जात आहेत. पालिकेत येणारे नागरीक आपली वाहने या अग्निशामक दलाच्या वाहनांभोवती लावत असल्याने आपात्कालीन स्थितीत ही वाहने बाहेर काढण्यासाठी वेळेचा अपव्यय होत आहे. परळी नगर परिषद प्रशासनाकडून शहरातील नागरी सुविधा व अत्यावश्यक बाबींकडे दुर्लक्ष केले जात आहे.

अग्निशामक दलामध्ये कर्मचाऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात सुविधांचा अभाव आहे. या संदर्भात नगर पालिका प्रशासनाकडे वारंवार मागणी करण्यात आली आली आहे. परंतु तरी देखील नगर पालिका प्रशासनाने सुविधा उपलब्ध केल्या नाहीत. इमारतीचा गैरवापर संपूर्ण बांधकाम होवुन तयार असलेली व वापराविना पडुन असलेल्या या इमारतीत व आजुबाजुला दारुच्या बाटल्या, निरोधांचा खच पडलेला आहे. या इमारतीचा ताबा रोडरोमिओ व तळीरामांनी घेतल्याने शासनाच्या पैशातुन उभारलेली ही इमारत नेमकी कशासाठी उभारली असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.



## केज शहरामध्ये वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने लावली हजेरी



केज । प्रतिनिधी

काल केज शहरामध्ये व तालुक्यातील काही ठिकाणी दुपारनंतर अर्धा ते पाऊण तास वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे शहरातील लोकांची आश्रय घेण्यासाठी धांदल उडाली. शहरातील जुनाट झाडे कोसळून पडली. उन्हाळाभर नाल्या घनकचऱ्याने कोंडल्यामुळे पाणी रस्त्यावरती आले.

केज नगरपंचायत मार्फत होणारी साफ सफाईचा वेग वाढवावा लागेल. आता कंबर कसून कामाला लागावे, कारण यंदा पावसाळा लवकरच सुरू झाला असून पावसाची दाहकता तीव्र आहे. वादळ वाऱ्यासह येणारा पाऊस संकटे निर्माण करत आहे. यामध्ये अचानक कोसळणाऱ्या पावसामुळे नाल्या कोंडलेल्या अवस्थेत असल्यामुळे सर्व पाणी व घनकचरा रस्त्यावरती येत आहे. त्याच्यामुळे अनेक ठिकाणी दुर्गंधी पसरत असून आरोग्यासोबत खिलवाड होताना दिसत आहे.

विजा आणि वादळी वाऱ्यासह कोसळणारा पाऊस यापासून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन शासनामार्फत करण्यात आलेले आहे.

## केजमध्ये कंटेनरने सात ते आठ वाहनाना धडक देऊन चिरडले

केज । प्रतिनिधी

बीड कडून भरधाव वेगात निघालेल्या एका कंटेनरने सात ते आठ वाहनाना धडक देऊन चिरडल्याची व यात एक महि तर २० ते २५ जण जखमी झाल्याची दुर्देवी घटना आज दुपारी केज मध्ये घडली असून घटनास्थळाहून फरार झालेला कंट पुढे लोखंडी सावरगाव नजिक पलटी झाला आहे. याविषयी प्राप्त माहिती अशी की आज दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बीड कडून भरधाव वेगात नेकनूर मार्गे केज मध् आलेल्या डीडी ०१- झेड ९७ ७१ क्रमांकाच्या कंटेनर ने सर्वप्रथम नेकनूर येथे काही जणांना चिरडले व त्यानंतर केज मधील अनिल पासून पुढे सात ते आठ वाहनांना चिरडत व पुढे काही वाहनांना फरपटत नेऊन सदर कंटेनर

▶ पान २ वर

## विंधन विहीर अधिगृहणाचे पैसे द्या हिवरा(गो) येथे ग्रामस्थांचे उपोषण

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

सरकारी कारभार आणि नागरिक बेजार अशी नेहमीचीच अवस्था बघायला मिळते. प्रशासकीय प्रक्रियेत कधी कोणती कामे अडून बसतील आणि कधी कोणती कामे क्षणार्धात निपटली जातील हे प्रशासनातील कर्मचारीच कळू जाणे. असाच काहीसा प्रकार परळी तालुक्यातील हिवरा येथील काही नागरिकांना अनुभवायला मिळत आहे.

गेल्या वर्षी पाणीटंचाईच्या काळात विंधनविहीर (बोअरवेल) अधिग्रहण केलेल्या तीन ग्रामस्थांना एक वर्ष उलटून गेल्यानंतर एक रुपयाही हाताला लागलेला तर नाहीच पण ग्रामपंचायत, तहसील, पंचायत समिती अशा चकरा मारून मनस्ताप सहन करण्याची वेळ मात्र नक्की आलेली आहे. या ग्रामस्थांनी आता गावातच ग्रामपंचायती समोर आपल्या मागणीसाठी उपोषण सुरू केले आहे.

परळी वैजनाथ तालुक्यातील हिवरा ( गो.) या गावात गेल्या वर्षी(२०२४) प्रशासनाच्या वतीने पाणीटंचाई निवारण करण्यासाठी नागरिकांच्या मालकीच्या खाजगी विंधन विहिरी (बोअरवेल) अधिग्रहण केले होते. साडेतीन महिने या विंधन विहिरींवरून ग्रामपंचायतीमार्फत गावाला पाणीपुरवठा केला. मात्र एक वर्ष उलटून गेल्यानंतरही विंधनविहीर अधिग्रहणाचे देयक मात्र प्रशासकीय जुमल्यामध्ये अडकून बसले आहे.

विशेष म्हणजे या नागरिकांच्या विंधनविहिरीतून साडेतीन महिने पाणी वापरण्यात आलेले आहे. मात्र अधिक माहिती घेतली असता महसूल प्रशासनाकडून याबाबतची केवळ १४ दिवसाची ऑर्डर काढण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे ही ऑर्डर महसूल प्रशासनाकडून देयक अदा करण्यासाठीच्या प्रक्रियेसाठी अजून पंचायत समितीकडे आलेली नाही. त्यामुळे नेमकी दाद कोणाकडे मागायची असा प्रश्न या नागरिकांपुढे निर्माण झाला आहे. एकतर साडेतीन महिने पाणी

▶ पान २ वर

## होळ अंबाजोगाई महामार्गावर अज्ञात वाहनाकडून खडीचा पाऊस



केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळ येथून अंबाजोगाई कडे जाणाऱ्या मुख्य रोडवरती आज अज्ञात वाहनाने खडी सांडल्यामुळे येणारी जाणारी वाहने यावरून घसरून पडत आहेत. टू व्हीलर घसरल्या जात असल्यामुळे या रोडवरती अपघात सदृश्य परिस्थिती तयार झालेली आहे. त्यामुळे या मार्गाने जाणाऱ्या वाटसरूंनी काळजी घ्यावी. तसेच रोड अथॉरिटीने याची दखल घेऊन त्वरित तो मार्ग क्लिअर करून द्यावा. तसेच ज्या अज्ञात वाहनाकडून ही खडी सांडलेली आहे त्या वाहनावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी येथील स्थानिक नागरिकांनी केलेली आहे.

## ऐतिहासिक निर्णय : ना. पंकजा मुंडेंच्या उपस्थितीत पशुसंवर्धन अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या

### समुपदेशनाने बदल्यांचा निर्णय भविष्यातही कायम राहील : ना. मुंडे

पुणे । प्रतिनिधी

पुन्हा एकदा इतिहास घडविताना या ऐतिहासिक क्षणाची मी साक्षीदार होतेयं याचा मला अतिशय आनंद होत आहे. अधिकाऱ्यांचे मनोबल वाढवून भ्रष्टाचारमुक्त धोरण राबविणे यासाठी पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या करण्याचा निर्णय मी घेतला. हा निर्णय भविष्यातही कायम राहील. गाव पातळीवर कष्ट करणाऱ्या सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद माझ्यासाठी महत्वाचा आहे. तुमच्या बदल्या मनासारख्या केल्या आहेत, आता चांगले आणि फ्रेश मनाने काम करा अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज अधिकाऱ्यांशी संवाद साधला.



राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा आणि बदल्यांची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा ऐतिहासिक निर्णय पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी नुकताच घेतला होता. या बदल्यांची प्रक्रिया आजपासून आयुक्त पशुसंवर्धन यांच्या कार्यालयात ना. पंकजाताईंच्या उपस्थितीत सुरू झाली, त्यावेळी

▶ पान २ वर

## गायी घेवून जाणारा टेम्पो पकडला

बीड । प्रतिनिधी

बीड शहरामध्ये दहा गाईसह दोन वासरे घेऊन जाताना (दि. १४) बुधवार रोजी रात्री टॅम्पो पकडला असून यातील जनावरे व टेम्पो असा एकूण १० लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पाच जणांविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टेम्पो क.एम.एच.१७ सीव्ही. ७६६४ यामध्ये बेकायदेशीर रित्या दहा गाई आणि दोन वासरे हैद्राबादकडे नेली जात होती. हा टेम्पो शिवाजी नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये पकडण्यात आला. यातील जनावरे व टेम्पो असा एकूण १० लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी माधव कारभारी खेमणर (रा. चन्नेगाव ता. संगमनेर जि. अहिल्यानगर), संकेत बाळासाहेब लांबगे (रा. लोणी प्रवारा ता. राहता जि. अहिल्यानगर), असनगरी श्रीसाई लांब (रा.इल्ली मेंदू, इब्राहीम पटनम रा. तेलंगणा), उपारी सतई (रा. जहगा इलिमेंदू इब्राहीम पटनम रा. तेलंगणा), मल्लया असनगरी (रा. जहगा इलिमेंदू रा. तेलंगणा) या पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जनावरे शिवाजी नगर पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. वैभव जाधव यांच्या फिर्यादीवरून सदरील कारवाई करण्यात आली आहे.

# केवळ थंड पाणी, गुणवत्ता गेली खड्ड्यात

## अन्न व औषध विभागाकडे नोंदणी आहे का ? शहरी व गावखेड्यातही वाढला कॅनचा उपयोग तपासणी करणारी यंत्रणा झाली गार, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

पात्रुड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यात पाण्याची कमतरता नव्हती. मात्र गेल्या ५ वर्षांपासून पाण्याची पातळी खालावत चालली. त्यातच आता बाटलीबंद आणि आरओच्या कॅनचे चलन वाढले. त्यातून गुणवत्ता नसतानाही केवळ पाणी थंड करून देण्यात येत आहे. त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊ लागला असून खिसे देखील रिकामे होत असताना केवळ दिखाव्यापोटी हा व्यवसाय फुलत असल्याचे शहरासह गावखेड्यांत देखील दिसून येत आहे.**



यंदा मार्चच्या पहिल्याच आठवड्यापासून उन्हाची तीव्रता कमालीची जाणवत आहे. त्यामुळे बाटलीबंद आणि आरओच्या कॅनमधील पाण्याला मागणी वाढली आहे. परिणामी हा व्यवसाय तेजीत आहे. असे असले तरी शुद्ध पाण्याच्या नावाखाली केवळ पाणी थंड करून विकण्याचा सपाटा काही व्यावसायिकांनी सुरू केला आहे. पाणी शुद्ध केले जाते की नाही, कमी कालावधीत बक्कळ पैसा कमविण्याच्या हव्यासापोटी बाटलीबंद आणि कॅनमधील परंतु अशुद्ध पाणीपुरवठा करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळले जात आहे. उन्हाळ्यात काही विक्रेत्यांकडून बाटलीवर निर्मितीची तारीख टाकण्यास टाळाटाळ करताना दिसून येतात. काही कंपन्यांचे पाणी 'मिनरल' असते तर काही कंपन्या 'पॅकेज्ड वॉटर'च्या नावाखाली बाटलीबंद पाणी विक्री करीत आहेत. सर्वत्र पाणपोईंची संख्या घटली आहे. अनेक सेवाभावी संस्था उन्हाळ्यात पाणपोई सुरू करीत होत्या. आता ही स्थिती बदलली आहे. त्यामुळे पाणपोई अथवा नळावर जाऊन पाणी पिणाऱ्यांची संख्याही कमी झाली आहे. सर्वांना बाटलीबंद पाण्याचा पर्याय उपलब्ध झाला आहे.आता बाटलीबंद पाणी विकत घेणे म्हणजे प्रतिष्ठेचेही लक्षण झाले आहे. हॉटेलातील पाणी पिणेही टाळण्यात येत असून बाटलीबंद पाणी खरेदी करण्यात येत आहे.काही व्यावसायिक वापरलेल्या बाटल्यांमध्ये नळाचे पाणी भरून ते थंड करून 'मिनरल वॉटर'च्या नावाखाली विकण्याचा गोरखधंदा सुरू केला आहे. सामान्य नागरिक पाणी शुद्धतेच्या मानांकनाबाबत अनभिज्ञ असतात. त्यामुळे त्यांच्याकडून याबाबीकडे दुर्लक्ष होते. नेमका त्याचाच गैरफायदा घेत पाणी विक्रेते ग्राहकांची लूट करीत आहेत. यातूनच पाणी विक्रीचा व्यवसाय आता ग्रामीण भागातही फोफावू लागला आहे. बाटलीबंद पाणी विकण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना आवश्यक असतो. तथापि, परवाना न काढताच काही उद्योजक निर्मिती करतात. याबाबत अन्न व औषध प्रशासन विभागही उदासीन दिसत आहे. यातून ग्राहकांच्या आरोग्याला

धोका पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे या विभागाने पाणी विकणाऱ्यांचा परवाना तपासण्याची गरज आहे.त्या पाण्यातील विविध घटकांची तपासणी करणेही आवश्यक आहे. अनेक ठिकाणी केवळ पाणी थंड करून ते विकले जाते.त्यात कोणते घटक आहे,कोणते घटक नाहीत, याबाबत सामान्य ग्राहकांना माहिती नसते. ते पाणी आरोग्यास घातक आहे का,याची तपासणी करणे गरजेचे आहे. मात्र अन्न व औषध प्रशासन विभाग उदासीन असल्याचे दिसून येत आहे

**बॉटल, पाऊचवर तारीख दिसत नाही**

पॅकबंद वस्तूंच्या वेष्टनावर निर्मिती आणि त्या वस्तूच्या उपयुक्ततेचा कालावधी नमूद करणे कायद्याने बंधनकारक आहे. संबंधित वस्तू कोणत्या तारखेला उत्पादित झाली, ती किती दिवस टिकणार आहे. अंतिम मुदत कधीची आहे, याबाबत त्या वस्तूच्या वेष्टनावर सर्व बाबी नमूद करणे संबंधित उत्पादक कंपनीला बंधनकारक आहे. मात्र अनेक कंपन्या पाण्याची बाटलीवर असा उल्लेख करीत नाहीत, असा उल्लेख असला तरी तो अस्पष्ट किवा वाचता येणार नाही, अशा पद्धतीने केलेले असते. अनेक घरांमध्ये तर पाण्याच्या कॅन जात आहे. त्यांची शुद्धताही तपासली जात नाही. केवळ पाणी थंड आहे. म्हणून ग्राहक ते विकत घेतात. यातून ग्राहकांची लूट होत असून त्यांच्या आरोग्याशीही खेळले जात आहे. कोणत्याही हॉटेल, पानठेल्यावर आता एक लिटर पाण्याची बाटली किमान २० रुपयांना मिळत आहे. अनेक शीतपेय निर्मिती कंपन्याही बाटलीबंद पाण्याची विक्री करीत आहेत. स्थानिक कंपन्याही या व्यवसायात उतरल्या आहेत.

आपल्याला होणारे ४० टक्के आजार पाण्याशी निगडित आहेत. मात्र आपण याकडे दुर्लक्ष करत चाललो. केवळ पेताना थंडगार पाणी मिळतो, त्यामुळे पाणी विकत घेवून पिण्याची चलती वाढली आहे. मात्र जे पाणी विकत घेत आहोत. त्याची शुद्धता किती, ते कसे तयार होते याचा विचार देखील करणे गरजेचे आहे.

– **डॉ.अमोल मायंकर,** आरोग्य अधिकारी, पात्रुड

# वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस, वीज पडून गाय ठार

केज । प्रतिनिधी

केज शहर आणि परिसरातील गावांत बुधवारी दुपारी विजेच्या गडगडाटासह वादळी वाऱ्यासह अवकाळी मुसळधार पाऊस पडला असून युसुफवडगाव येथे वीज पडून गाय जागीच ठार झाली. जोराच्या वादळी वाऱ्याने आंबा फळझाडांचे मोठे नुकसान झाले आहे. केज शहर आणि परिसरातील गावात बुधवारी सकाळपासून वातावरणात उकाडा वाढला होता. त्यानंतर दुपारी काळे ढग जमा होऊन दुपारी २ वाजेच्या सुमारास जोराचे वादळ आले. या वादळात विजेच्या गडगडाटासह पावसाला सुरुवात झाली. त्यानंतर तब्बल एक तासांपर्यंत मुसळधार पाऊस पडला. वादळाने आंब्याच्या कैऱ्या गळून पडल्या असून आंबा फळझाडांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

दरम्यान, युसुफवडगाव परिसरात ही विजेच्या गडगडाटासह आणि वादळी वाऱ्यासह पाऊस पडला असून या पावसात वीज पडल्याने युसुफवडगाव शेतकरी पुरुषोत्तम श्रीकृष्णाजी भुतडा यांची एक गाय जागीच ठार झाल्याची माहिती तहसीलदार राकेश गिड्डे यांनी दिली.

**वीज पुरवठा खंडित**

केज शहरात वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी मुसळधार पावसामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला होता. दुपारपासून विद्युत गुल झाल्याने नागरिकांचे वीज कधी येते? याकडे लक्ष लागले होते.

**घरात, दुकानात शिरले पाणी**

कळंब रस्त्यावर एका बाजूचे काम महामार्गाचे काम करणाऱ्या एजन्सीने प्रलंबित ठेवले आहे. सांडपाणी वाहून जाण्यासाठी नाली नसल्याने अवकाळी मुसळधार पावसाचे पाणी कळंब रस्त्यालगत वास्तव्यास असलेल्या सतीश बनसोडे, अविनाश बनसोडे, अलका सरवदे यांच्या राहत्या घरात आणि किराणा दुकानात पाणी शिरले. घरातील सामान, किराणा दुकानातील माल आणि वस्तूचे नुकसान झाले आहे.

# आ. नमिता मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या तिरंगा यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

'ऑपरेशन सिंदूर'च्या ऐतिहासिक यशानंतर राष्ट्रभक्ती जागृती अभियानाच्या अंतर्गत केज विधानसभा मतदारसंघात आ. नमिता मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोटारसायकल तिरंगा यात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आज सकाळी ८:३० वाजता 'अक्षय निवास', रिंग रोड येथून या मोटारसायकल तिरंगा यात्रेची सुरुवात झाली. देशभक्तीचे स्वर, युवकांची ऊर्जा आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण परिसर भारावून निघाला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात



सामूहिक राष्ट्रगीताने या यात्रेचा समारोप झाला.

या यात्रेला नंदकिशोर मुंदडा, आ. नमिता मुंदडा, अक्षय मुंदडा, डॉ. नवनाथ घुगे, डॉ . सुधीर धर्म पात्रे, डॉ. निशिकांत पाचेगावकर, डॉ. श्रीनिवास रेड्डी, अनंत अरसुडे, शहराध्यक्ष संजय गंभीरे यांच्यासह भाजपाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते, माजी सैनिक, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील मान्यवर, महिला व युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# चिंचोली माळी अतिक्रमण हटविण्यात यावे

## अन्यथा २७ मे रोजी अमरण उपोषण करणार : रोहन गलांडे

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील नागबेट वस्ती ते नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील व ग्रामीण महामार्ग हद्दीत येणारे अतिक्रमण तात्काळ हटविण्यासाठी २६ एप्रिल रोजी रोहन गलांडे यांनी आत्मदहनाचा इशारा दिला होता, परंतु प्रशासनाने दिलेल्या पत्राद्वारे ३० दिवसाचा वेळ मागितला आहे, तरी प्रशासनाद्वारे ३० दिवसात अतिक्रमण हटविण्यात आले नाही तर २७ में २०२५ रोजी अमरण उपोषन करणार असल्याचे गलांडे यांनी स्पष्ट केले. 'जर उपोषणा दरम्यान मला काही झाले तर बांधकाम विभाग



पंचायत समिती केज व प्रशासन जबाबदार राहील' असे यावेळी गलांडे यांनी म्हटले आहे.

या विषयी सविस्तर वृत्त असे की चिंचोली माळी येथील नागबेट वस्ती ते नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील बांधकाम विभाग केज यांच्या हद्दीत येणारे अतिक्रमण तात्काळ हटविण्यासाठी २७ मे रोजी आत्मदहन करण्याचा इशारा सार्वजनिक बांधकाम विभाग केज यांना दिलेला आहे, तरी आंदोलन दरम्यान मला काही झाले तर प्रशासन जबाबदार राहील असे निवेदनाद्वारे कळविण्यात आलेले आहे. तरी ३० दिवसात अतिक्रमण हटविण्यात यावे ही विनंती प्रशासनाला निवेदनाच्या माध्यमातुन देण्यात आली.

# मोफत सर्व रोग निदान शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंकुर प्रतिष्ठान व संशोधन संस्था, अंबाजोगाई यांच्या वतीने दि.१५ मे गुरुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या सर्व रोग निदान शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी अंकुर प्रतिष्ठानचे अध्यक्ष रा.गो.धाट, सचिव अशोक पत्की, कार्यवाह सुभाष देशपांडे, समन्वयक सुधीर धर्माधिकारी, डॉ.कौस्तुभ अशोक कुलकर्णी, डॉ.गौरी कौस्तुभ कुलकर्णी, डॉ.स्नेहल शिवराज पेस्टे, डॉ.ओंकार अनिल ताथोडे आदी उपस्थित होते.

या प्रसंगी रा.गो.धाट यांनी




सांगितले की, पुढील काळात प्रत्येक आठवड्यातून एक वेळा आरोग्य शिबीर आयोजित करण्यात यावे म्हणजे या माध्यमातून रुग्ण सेवा होईल. उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. संचालन सुधीर धर्माधिकारी यांनी तर आभार अशोक पत्की यांनी मानले. यावेळी ॲड.अशोक कुलकर्णी, समीर धाट, संजय देशपांडे, भास्कर देशपांडे, मिलिंद कुलकर्णी, शरद पंढरपूरकर, आरती कुलकर्णी, सुजाता धर्माधिकारी, बाळासाहेब पौळ, निशिगंधा यांच्यासह ग्रामस्थ इतर नागरिक महिला उपस्थित होते. तालुक्यातील लोखंडी सावरगाव, हिवरा, डिघोळ अंबा, वरपगांव, सोमनाथ बोरगाव, चाकूर आदी भागातील रूग्णांनी या शिबीराचा लाभ घेतला.

# पोळ मयुरी भीमा या मुलीने बारावी परीक्षेमध्ये ७८ टक्के गुण मिळवून गाठले यशाचे शिखर

बीड । प्रतिनिधी

साक्षाळ पिंपरी माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.पोळ मयुरी भीमा या मुलीने बारावी सायन्स शाखेतून तब्बल ७८.०० टक्के गुण मिळवून महाविद्यालयाचे तसेच पोळ परिवाराचे नाव लौकिक केले असून अत्यंत कसोटीने आणि जिद्दीने कुठल्याही बाहेरच्या क्लास न जाता सेल्फ स्टडी करून स्वतः घरी उत्कृष्ट बुद्धी कौशल्य पूर्वक अभ्यास करून या अभ्यास कौशल्याच्या जोरावर तिने आपले नाव परिवाराचे व साक्षाळ पिंपरी माध्यमिक उच्च माध्यमिक महाविद्यालयाचे नाव बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र लौकिक केले.



बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र पोळ मयुरी या मुलीच्या उत्कृष्ट अभ्यास कौशल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. भविष्यामध्ये प्रशासकीय मोठ्या पदावर विराजमान होऊन सर्वसामान्य लोकांची सेवा तिच्या हातून घडावी अशा सदिच्छा आणि शुभेच्छा सर्व आप्तेष्ट परिवाराच्यावतीने कु मयुरी यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी भरभरून मनस्वी शुभेच्छा सर्वत्र मयुरी यांना मिळत आहेत मयुरी या मुलीचा आदर्श महाराष्ट्रातील तमाम इतर मुलींनी घ्यावा असे देखील सर्व मयुरी यांना शुभेच्छा देणाऱ्या मान्यवरांच्या वतीने बोलले जात आहे.

# आशना खान पठाण चे दहावीत ८७.६०% गुण

बीड । प्रतिनिधी



शहरातील पत्रकार तथा शिक्षक मरहूम रईस खान पठाण यांची सुकन्या आशना खानम हिने नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत ८७.६०% गुण घेत दणदणीत यश मिळविले आहे. यामुळे एकीकडे आनंद होत असून दुसरीकडे मात्र हे यश पाहण्यासाठी तिचे वडील आज आपल्यात नाहीत याचे तिच्यासह कुटुंब आणि वृत्तपत्र क्षेत्रातील सर्वांनाच दु:ख होत आहे. आशना खानम रईस खान ही शहरातील सर सय्यद अहेमद खान उर्दू शाळेची विद्यार्थिनी आहे. तिने ८७.६०% गुण घेऊन यश संपादन केल्याने तिचे सर सय्यद अहेमद खान उर्दू शाळेचे मार्गदर्शक मुश्ताक अन्सारी, सचिव शेख वकील, मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़, दैनिक माझी सरकारचे उपसंपादक साजेद सलीम यांच्यासह प्राचार्य, शिक्षक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, नातेवाईक, मित्र परिवाराकडून तिचे अभिनंदन केले आहे. आशना खानम पठाण हिचे वडील तथा उर्दू दैनिक एशिया एक्सप्रेस (औरंगाबाद) आणि दैनिक तहेलका टाईम्स (नांदेड़) चे बीड जिल्हा प्रतिनिधी रईस खान पठाण यांचे काही वर्षांपूर्वी अकस्मात निधन झाले आहे. आज आशना ने मिळविलेले यश पाहण्यासाठी ते हयात नाहीत ही बाब मोठी दु:खद आहे.

# शेख सोफीयान शमशुद्दीन यांचा दहावीच्या परीक्षेत उज्वल यश

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या दहावीच्या (डडउ) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, शेख सोफीयान शमशुद्दीन यांनी या परीक्षेत ७५.८० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

सोफीयान यांनी एकूण ५०० पैकी ३७९ गुण मिळवले असून, सर्व विषयांमध्ये चांगल्या गुणांसह उत्तीर्ण झाले आहेत. विशेषतः विज्ञान व तंत्रज्ञान (८२ गुण) आणि समाजशास्त्र (८१ गुण) या विषयांमध्ये त्यांचा उल्लेखनीय भरारी दिसून येतो. त्यांच्या यशामागे आई हिना यांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे मोलाचे सहकार्य आणि स्वतःच्या मेहनतीचे फळ आहे. शेख सोफीयान यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

# नागनाथ विद्यालयाची दहावीच्या निकालाची उज्वल परंपरा कायम

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मोरगांव येथील नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९४.८७% इतका लागला असून यावर्षी पण उज्वल निकालाची परंपरा या शाळेने कायम राखली आहे.







महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे ११७ पैकी १११ विद्यार्थी उत्तीर्ण होवून विशेष प्राविण्यात ८२, प्रथम श्रेणीत २४, द्वितीय श्रेणीत ०२ तर तृतीय श्रेणीत ०३ विद्यार्थी उत्तीर्ण होवून शाळेचा शेकडा निकाल ९४.८७% एवढा लागला यात गुणानुक्रमे प्रथम कु.टाकळे तेजस्वी संतोष ९६.६०%, द्वितीय कु.भड काजल केशव ९६.२०%, तृतीय चि.दुधाळ अभिषेक दत्तात्रय ९५.६०% गुण मिळवून उत्तीर्ण झाले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, कार्यालयीन अधिक्षक प्रकाश राठोड, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य डी.बी. माटे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

पान १ वरून...

## ऐतिहासिक निर्णय : ना. पंकजा मुंडेंच्या उपस्थितीत

त्या बोलत होत्या. पशूसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी, आयुक्त प्रवीण कुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतल मुकणे यावेळी उपस्थित होते.

ग्रामविकास मंत्री असताना शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांचा निर्णय मी घेतला होता, त्यावेळी त्याचा फायदा अनेक शिक्षकांना जे तिथपर्यंत पोहोचू शकत नव्हते त्यांना झाला. आऊट ऑफ बॉक्स जाऊन निर्णय घेण्याची आवड असल्याने आताही पशुसंवर्धन विभागासाठी मी हा निर्णय घेतला. एकदा घेतलेला निर्णय बदलत नाही, त्यामुळे भविष्यातही हा निर्णय कायम राहणार आहे. माझे वडील लोकनेते मुंडे साहेब नेहमी म्हणायचे, ज्याची पत नाही, ऐपत नाही त्यांचा आवाज बनण्यासाठी मी राजकारणात आहे, अगदी तोच वारसा घेऊन मी काम करत आहे. माझ्यावर प्रेम करणारे असंख्य लोकं आहेत, त्यांच्यासाठी तुम्ही काम करता, त्यामुळे हा निर्णय घेतला. सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद मला महत्वाचा वाटतो. वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी आपल्या परिवारापासून दूर असणारे, आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना यामुळे हवी ती पोस्टींग मिळणार आहे. हव्या त्या ठिकाणी बदल्या झाल्याने तुमच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद समाधान देणारा आहे असं ना. पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.

हवी ती पोस्टींग मिळाली, अधिकारी खूश!

समुपदेशनाने बदल्यांची कार्यवाही आजपासून सुरू झाली असून उद्याही म्हणजे १६ मे रोजी ही कार्यवाही सुरू असणार आहे. आज आदिवासी व नक्षलग्रस्त अवघड क्षेत्रात असलेल्या ११८ आणि बिगर अवघड क्षेत्रात असलेल्या ४४४ अधिकाऱ्यांच्या बदल्या त्यांच्या मनाप्रमाणे करण्यात आल्या. ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतलेल्या निर्णयामुळे मनाप्रमाणे आणि सहजतेने हवी ती पोस्टींग मिळाल्याने अधिकारी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

खूप चांगला निर्णय – डॉ आकाश ठाकरे

मी यवतमाळ जिल्ह्यातील आहे, माझी पहिली पोस्टींग २०२२ मध्ये त्र्यंबकेश्वर येथे झाली. आदिवासी क्षेत्रात तीन वर्ष सेवा दिली. आता समुपदेशनाने मला माझा जिल्हा मिळाला. मला खूप आनंद झाला. ना. पंकजाताईंनी घेतलेला निर्णय आमच्या सारख्या अधिकाऱ्यांचे मनोबल वाढविणारा आहे.

डॉ. प्रियंका स्वामीदास

मी सिरोंचा तालुक्यात कार्यरत होते. हा भाग तेलंगणा सीमेवर असल्याने इथे मराठीपेक्षा तेलगू बोलली जाते. मला तेलगू भाषा येते.खेड्यातील लोकांशी चांगला संवाद साधता येतो. लोकं म्हणाले तुमची बदली झाल्यावर आमचे कसे होईल? आता समुपदेशनाने मी इथेच राहिले. हवे असलेले ठिकाणी मिळाल्याने मी खूश आहे. खरचं हा निर्णय ऐतिहासिक आहे. मंत्री महोदय ना. पंकजाताईंचे खूप खूप आभार!

## विंधन विहीर अधिगृहणाचे पैसे द्या

दिल्यानंतर ऑर्डर केवळ १४ दिवसाची का? हा मुळ प्रश्न आहे. त्यातही सर्वच ठिकाणी उडवाउडवी आणि असमाधानकारक अशी उत्तरे त्यांना मिळत आहेत. या सर्व प्रक्रियेला त्रस्त झालेल्या नागरिकांनी अखेर आपल्या गावातच ग्रामपंचायत समोर आमरण उपोषण सुरू केले आहे. हिवरा (गो.) या गावातील तीन शेतकर्यांनी आज सकाळपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. सौ.मंडोदरी शेषराव चौधरी, उत्तमराव नारायणराव गंगणे, केशव पंडीत वाघमारे या नागरिकांनी हे उपोषण सुरू केले असुन प्रशासनाने या नागरिकांना न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## केजमध्ये कंटेनरने सात ते आठ वाहनाना धडक देऊन चिरडले

आंबेजोगाईच्या दिशेने फरार झाला प्राथमिक माहितीनुसार यामध्ये एक महिला ठार तर २० ते २५ जण जखमी झाले असून यातील आठ ते दहा गंभजखमीला आंबेजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हलवण्यात आल्याचे वृत्त असून आज केज शहरात आठवडी बाजा असल्याने रस्त्यावर तोबा गर्दी असताना या दुर्घटनेत मोठा अनर्थ टळला आहे.

सदर कंटेनर अनेक वाहनांना धडक देऊन अंबाजोगाईकडे येत असताना वाटेत त्याने चंदन सावरगाव नजिक आणख वाहन चालकास चिरडले असून या दुर्घटनेची माहिती मिळताच युसुफ वडगाव पोलीस स्टेशनच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी रोडवर येऊन सदर कंटेनरचा पाठलाग सुरू केला असता हा कंटेनर लोखंडी सावरगाव येथे पलटी झाला असून केज पान पाठलाग केलेल्या संतप्त जमावाने नंतर हा कंटेनर पेटवून दिल्याची माहिती आहे.

# आजारावर मात करून दहावीत घडवली यशाची क्रांती

## आटपाडीच्या संस्कृती पाटीलचा माजी आमदार राजेंद्र देशमुख यांच्याकडून गौरवपूर्ण सत्कार



आटपाडी । प्रतिनिधी
अपार इच्छाशक्ती, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर संकटांवर मात करत आटपाडीच्या संस्कृती सुधीर पाटील हिने दहावीच्या परीक्षेत ८०.८० टक्के गुण मिळवून गावाचे आणि माणदेशाचे नाव उज्वल केले आहे. तिच्या या प्रेरणादायी यशाबद्दल श्रीमंत बाबासाहेब देशमुख सुत गिरणी येथे आयोजित कार्यक्रमात तिचा सन्मान करण्यात आला. या गौरव सोहळ्याला माजी आमदार राजेंद्र अण्णा देशमुख प्रमुख उपस्थित होते. विलास खरात यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. यावेळी पत्रकार सुधीर पाटील, श्रीरंग कदम, ऋषिकेश देशमुख, विठ्ठल गवळी, आपा खरात, आदी मान्यवर उपस्थित होते.
संस्कृती ही दी आटपाडी एज्युकेशन सोसायटीच्या बालभवन डे स्कूलची विद्यार्थिनी आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला अपघात होऊन ती सलग पाच महिने शाळेपासून दूर राहिली होती, त्यातील तीन महिने ती अंथरुणावर खिळून होती. मात्र या काळातही तिने हार न मानता आत्मविश्वासाने आणि अभ्यासाच्या ध्यासाने पुन्हा उभारी घेतली. शेवटच्या तीन महिन्यांत शाळेत नियमित उपस्थित राहून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तिने अभ्यास सुरू ठेवला आणि यश संपादन केले.
यावेळी राजेंद्र अण्णा देशमुख म्हणाले, संस्कृतीसारख्या विद्यार्थिनींमुळे समाजात सकारात्मक उर्जा निर्माण होते. अशा मुलींनीच पुढे जाऊन देशाचे भविष्य उज्वल करायचे आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी जर जिद्द आणि प्रयत्न प्रामाणिक असतील, तर यश अटळ असते, हे संस्कृतीने सिद्ध केले आहे. तिच्या या कार्याची दखल घेणे ही आमची सामाजिक जबाबदारी आहे. या यशाबद्दल संस्कृतीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. तिचा प्रवास अनेक विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.

## लोकशाही पत्रकार महाराष्ट्र राज्यच्या प्रदेश अध्यक्षपदी राजेंद्र केदार

मुंबई । प्रतिनिधी
लोकशाही पत्रकार संघांच्या प्रदेश अध्यक्ष घाटकोपर (पश्चिम), मुंबई कला –क्रीडा– सांस्कृतिक विकास समिती पदी राजेंद्र केदार यांची निवड करण्यात आली. ही निवड




संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, आयेशाखान मुलानी, निलोफर शेख प्रदेश अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र, प्रदेश अध्यक्ष उद्योग विकास समिती मनीषा धिरडे, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, साजेद सय्यद, अनिस कुरेशी यांच्या आदेशानुसार सुनील भोसले प्रदेश अध्यक्ष भटक्या विमुक्त जाती जमाती विकास समिती, यांनी निवड जाहीर केली.
नवनिर्वाचित कला क्रीडा सांस्कृतिक समितीचे प्रदेश अध्यक्ष राजेंद्र केदार म्हणाले की, महाराष्ट्र राज्य जिल्ह्यातील सर्व तालुक्यात लोकशाही पत्रकार संघ संलग्न सर्व विकास समिती च्या कार्यकारणी लवकरच तयार करण्यात येतील. या समिती मार्फत लोकांचे सामाजिक, आर्थिक, वयक्तिक, शासकीय योजनाची कामे केली जातील. विशेष म्हणजे महाराष्ट्र मधील वंचित कलाकार यांना छोटे मोठे काम देण्याचा आम्ही प्रयत्न करू. यावेळी भास्करराव पांढरे, रमेशराव शिंदे, विष्णुपंत गाडेकर, गणेशराव गुजर, महादेव मोहिते, संदीप काळे, मुखीत खान, अमोल काळे, आदी उपस्थित होते.
संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती सुनंदा केदार, प्रदेश अध्यक्ष मनीषा धिरडे – उद्योग विकास समिती, मराठवाडा उपाध्यक्ष दत्ता भाऊ नरनाळे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य, संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती मनमोहन तोमर नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष, पांडुरंग साळुंके पुणे जिल्हा अध्यक्ष, प्रदेश उपाध्यक्ष सरपंच ग्रामपंचायत विकास समिती सखाराम पोहीकर, मराठवाडा उपाध्याक्ष बाळासाहेब फपाळ, नांदेड जिल्हा सचिव बाजीराव गायकवाड, शिवराज बिराजदार सोलापूर शहर उपाध्यक्ष, नवी मुंबई सरचिटणीस बालाजी सूर्यवंशी, लक्ष्मण भोसले – सोलापूर शहर सचिव, जस्मित तोमर – नवी मुंबई महिला आघाडी, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती श्रद्धा कंडूडे, मराठवाडा युवक अध्यक्ष दिपक भाऊ थोरात, प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मन:पूर्वक खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

## राजवर्धन पंडितचे एसएससी परीक्षेत उज्वल यश



गेवराई । प्रतिनिधी
छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूलचा विद्यार्थी राजवर्धन रोहित पंडित यांनी मार्च २०२५ मध्ये झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुण प्राप्त करून उज्वल यश संपादन केले आहे या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.
छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूलमध्ये शिक्षण घेणारा राजवर्धन पंडित हा विविध क्षेत्रांमध्ये अग्रेसर असून अनेक स्पर्धेमध्येही त्याने नावलौकिक मिळवलेला आहे. नुकत्याच झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुण घेऊन यश संपादन केलेला राजवर्धन पंडित हा माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा नातू आणि युवा नेते रोहित पंडित व माजी नगरसेविका स्वरूपाताई पंडित यांचा मुलगा आहे. या यशाबद्दल माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, गिरिकाभाभी पंडित, माजी जि प सभापती युधाजित पंडित, सौ अनुरूपाताई पंडित, युवानेते रोहित पंडित, सौ स्वरूपाताई पंडित, यशराज पंडित यांच्यासह प्राचार्य व सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## बार्टीच्या विशेष योजनेची तातडीने अंमलबजावणी करावी : नितीन सोनवणे




बीड । प्रतिनिधी
ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र राज्य प्रवक्ते तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे गुणवंत विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत जाहीर करण्यात आलेल्या विशेष योजनेची त्वरित अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. ही योजना २०२१ साली जाहीर झाली होती, परंतु महाराष्ट्र शासनाने अद्याप ती कार्यान्वित केलेली नाही.
सोनवणे यांनी सांगितले की, बार्टीच्या या विशेष योजनेमुळे अनुसूचित जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मोठा आधार मिळेल. मात्र, ही योजना बंद असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि व्यावसायिक भवितव्य धोक्यात आहे. ही योजना तातडीने सुरू करून सामाजिक न्यायाच्या दिशेने ठोस पाऊल उचलावे, अशी मागणी त्यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे केली आहे.
ऑल इंडिया पँथर सेना या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनावर दबाव आणण्यासाठी पुढील काळात आंदोलनात्मक पावले उचलण्याचा विचार करत आहे. याबाबत सोनवणे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या हितासाठी आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही. शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अन्यथा राज्य भर ऑल इंडिया पँथर सेना महाराष्ट्र राज्य रस्त्यावर उतरेल याची शासनाने दखल घ्यावी.

## सौरभ शिवाजी चांगण या विद्यार्थ्यांचा रेणुका महाविद्यालयांमध्ये प्रथम क्रमांक



बीड । प्रतिनिधी
रेणुका माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पालवन तालुका जिल्हा बीड येथील इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के, प्रथम चांगण सौरभ शिवाजी ९०.८०% घेऊन प्रथम परळकर कोमल अशोक ९०.४०% घेऊन द्वितीय दौंड समृद्धी नानासाहेब नव्वद पॉईंट टक्के घेऊन तृतीय सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन कैलासवासी यशवंतराव चव्हाण शिक्षण प्रसारक मंडळाचे रेणुका माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पालवन तालुका जिल्हा बीड चे अध्यक्ष मच्छिंद्र मस्के आप्पा, सचिव तुषार भैय्यासाहेब मस्के सर्व संचालक मंडळ सर्व पालक गावकरी विद्यालयाचे प्राचार्य माननीय युवराज मुरूमकर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक हार्दिक असे अभिनंदन केले विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा दिल्या, यावेळी सौरभने आई–वडिलांचे स्वप्न साकार केले, सौरभ वर नातेवाईकांचा अभिनंदनचा वर्षाव होत आहे.


## तलवाडा जि.प. शाळेचा दहावीला दरवर्षीप्रमाणे यशाचा झेंडा: ९७.३३% निकाल, उर्दू विभाग शंभर टक्के!



तलवाडा । प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, तलवाडा या ग्रामीण भागातील विद्यालयाने ९७.३३% निकालाची उज्वल कामगिरी करत यशाचा झेंडा फडकावला आहे. यंदा शाळेतील राऊत अमित दुर्गादास याने ९३.२०% गुणांसह प्रथम क्रमांक, कुमारी गौरी एडके हिने ८९.८०% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर कुमारी शिंगणे गायत्री मोहन हिने ८८.४०% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.
एकूण ८५ विद्यार्थ्यांपैकी ८३ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाळेचा एकूण निकाल ९७.३३% लागला. विशेष म्हणजे उर्दू माध्यमातील सर्व चारही विद्यार्थ्यांनी १००% निकालासह यश संपादन केले यामध्ये कु. पठाण रिदा शेरखान ७३.२०% प्रथम, कु. शेख अल्फिया अफसर ६२.२०% द्वितीय, कु. शेख आदिबा दिलावर ५७.२०% तृतीय येण्याचा मान पटकवला. ही बाब शाळेसाठी भूषणावह ठरली. या घवघवीत यशामागे मुख्याध्यापक विजय डोंगरे, परीक्षा विभाग प्रमुख जायभाये, तसेच मार्गदर्शक शिक्षक पी.बी. जाधव, एस.टी. खेडकर, एस.एच. राठोड, आर.एस. मुसळे, बी.के. जाधव, शेरकर सर, ऐश्वर्या मॅडम, बंडे, कवरे, गव्हाणे, कुलकर्णी, पी.एस. राठोड, डोंगरे मारुती सर, डोंगरे अविनाश सर, श्रीम. हंबर्डे मॅडम, तातुडे मॅडम, शेळके मॅडम, हातागळे तसेच उर्दू विभागप्रमुख महम्मद ईल्यास व मुज्झमील सर यांचे योगदान अतुलनीय आहे. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन पखाले, उपाध्यक्ष मदन काळे, सदस्य सुमेध करडे, विष्णू खेत्रे सर आणि इतर सर्व सदस्य, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## नाथ हायस्कूल शाळेचा ९९.०८ टक्के निकाल

बीड । प्रतिनिधी
नाथ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नाथ हायस्कूल नाथापूर तालुका





जिल्हा बीड उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत यावर्षीचा एस.एस.सी.परीक्षा मार्च २०२५ शाळेचा निकाल ९९.०८% लागला. यावर्षी एकूण ११२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी १११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.
नाथापूर केंद्रातून सर्वप्रथम येण्याचा मान नाथ हायस्कूल नाथापुर ची विद्यार्थिनी कु.शेख आर्शिया शफार–९८%, कु.देवडकर श्रेया किशोर–९७.६०%, कु. वीर आकांक्षा प्रशांत–९७% तसेच विशेष प्राविण्य–८६ विद्यार्थी प्रथम श्रेणी–१५ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी–०९ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन चांगले यश संपादन केले असून सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मदनरावजी चव्हाण, सरपंच मयुरीताई सुंदरराव चव्हाण, उपसरपंच सतीश शिंदे व समस्त गावकरी, शाळेचे मुख्याध्यापक एस.बी. धुरवडे, नाथ कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद चव्हाण, साईनाथ मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक चव्हाण तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नाथ हायस्कूल नाथापूर यांनी अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## विजय शहाला देशद्रोही जाहीर करा : आझाद क्रांती सेना




माजलगाव । प्रतिनिधी
आज दिनांक १५ मे २०२५ रोजी आझाद क्रांती सेनेच्या वतीने महामहीम राष्ट्रपती यांना तहसीलदार मार्फत निवेदन देण्यात आले की कर्नल सोफिया कुरेशी बद्दल मंत्री विजय शहा यांनी अपशब्द वापरले असल्याने मंत्री विजय शहा याची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.
सविस्तर वृत्तांत असे की ज्या अतिरेक्यांनी आपल्या निष्पाप नागरिकावरती गोळीबार करत मारले त्याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंदूर राबवत कर्नल सोफिया कुरेशी विंग कमांडर वैदिका सिंग यांनी पाकिस्तानातील दहशतवादी तळावर हल्ले करून दहशतवाद्यांना समूळ नष्ट केले अशा जाबाज सैनिकांच्या पराक्रम व शौर्याच्या संपूर्ण देश कौतुक करत असताना मध्यप्रदेश सरकारमधील भाजपा मंत्री विजय शहा यांनी आम्ही अतिरेक्यांना मारण्यासाठी त्यांची बहीण पाठवली म्हणत बेताल व बेजबाबदार संतापजनक वक्तव्य करून आपल्या सैनिकांचा अवमान करीत त्यांचं मनोधैर्य खचवण्याचा प्रयत्न केला आहे अशा मंत्र्याला संविधानिक पदावरती राहण्याचा कुठलाही अधिकार नाही म्हणून महामहीम राष्ट्रपती यांनी विजय शहा याची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करून त्याच्यावरती देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी आझाद क्रांती सेनेच्या वतीने महामहीम राष्ट्रपती यांना तहसीलदारांमार्फत निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे.
याप्रसंगी आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे, तालुकाप्रमुख अशोक ढगे, तालुका सचिव किसन गोपाळ पैंजणे, भिसे सर, संदीप भिसे, अजून कुरेशी मोझम कुरेशी, सिद्धार्थ साळवे, भारत डोंगरे सुभान अली आदी उपस्थित होते.



धर्मवीर, स्वराज्य रक्षक, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त खा.बजरंग सोनवणे, आ.सदीप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शंभूप्रमे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तेलगाव जिल्हा परिषद गटात चेहरा नवा फक्त बाळासाहेब सोनटक्के चीच हवा



तेलगाव । प्रतिनिधी
जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीचे वारे वाहू लागले असून आता निवडणुकीचा मार्ग मोकळा झाल्यामुळे गावागावात राजकारणाची चर्चा सुरू आहे. तेलगाव जिल्हा परिषद गट हा बीड जिल्ह्यातील मातब्बर नेत्याचा गट मानला जातो. परंतु सद्य परिस्थिती पाहता व राजकीय उलथा पालत पाहता या तेलगाव जिल्हा परिषद गटामध्ये नवीन चेहऱ्याला संधी मिळू शकते आणि येथील मतदार वर्ग हा नवीन चेहऱ्याच्या शोधात असून बाळासाहेब सोनटक्के यांच्या रूपाने युवकांमध्ये प्रचंड उत्सुकता दिसून येत आहे. बाळासाहेब सोनटक्के हे अनेक वर्षापासून सामाजिक कार्य करत असून ते कुठल्याही राजकीय पक्षाशी बांधिल नाहीत. सतत समाजसेवेचा ध्यास घेतलेले बाळासाहेब हे सर्वसामान्य लोकांमध्ये आपुलकीचे वाटतात कुठलीही समस्या असो त्या समस्येला मदत करण्यासाठी बाळासाहेब सोनटक्के हे कधीही तत्पर असतात. त्यांच्याकडे ना कधी राजकारण ना कधी जात न धर्म त्यामुळे बाळासाहेब सोनटक्के हे या जिल्हा परिषद गटामध्ये चर्चेमध्ये आहेत. अनेक महिन्यापासून स्थगित असणाऱ्या निवडणुका होणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्सुकता दिसून येत आहे आणि बाळासाहेब सोनटक्के यांना जिल्हा परिषदेमध्ये पाठवून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी व तेलगाव मतदार संघावर प्रस्थापितांचे वर्चस्व मोडीत काढण्यासाठी बाळासाहेब सोनटक्के हे योग्य उमेदवार असल्याने आज तेलगाव जिल्हा परिषद मतदार संघामध्ये गावागावात चर्चा सुरू आहे.
येणाऱ्या काळात एक प्रामाणिक, निपक्ष व धडाडीचा तरुण कार्यकर्ता या गटाचे प्रतिनिधित्व करणार असल्याने तेलगाव जिल्हा परिषद गटामध्ये बाळासाहेब सोनटक्के यांची हवा आत्तापासूनच सुरू झाली आहे.

## हेमंत पोखरणा यांची दिल्ली येथील जैन कॉन्फरन्सच्या प्रांतीय मंत्रीपदी निवड

आष्टी । प्रतिनिधी
स्थानकवासी जैन समाजाची मातृ संस्था असलेल्या जैन कॉन्फरन्स



दिल्ली च्या प्रांतीय मंत्री पदी कडा येथील श्री अमोलक जैन शिक्षण संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानक वासी जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन चे प्रांतीय अध्यक्ष मोहनलाल लोढा आणि प्रांतीय सेक्रेटरी शांतीलाल दुगड यांनी हेमंत पोखरणा यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन ही नियुक्ती जाहीर केली आहे.
हेमंत पोखरणा गेले कित्येक वर्षापासून साधुसंतांच्या सेवेत असतात. जैन श्रावक संघाचे कार्य ते नेहमी पुढे होऊन करत असतात तसेच अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा चे ते सचिव आहेत या माध्यमातून त्यांनी तन–मन– धन अशाप्रकारे कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आली आहे. हेमंत पोखरणा यांचे संपूर्ण जिल्हाभरातून अभिनंदन होत आहे.

## सिरसाळ्यात वैशाख पौर्णिमा उत्साहात संपन्न व गाथा पठणाने वातावरण बहरले



सिरसाळा । प्रतिनिधी
सिरसाळा येथील सम्राट अशोक बुद्ध विहारात वैशाख पौर्णिमा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयु रामदादा किरवले होते, तर ध्वजारोहण आयु प्रियंका विजयानंद बनसोडे आणि आयु मंगल साहेबराव किरवले यांच्या हस्ते झाले.
कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती सदस्यांच्या हस्ते पुष्प, दीप आणि धूपाने अभिवादन करून करण्यात आली. यानंतर, वैशाख पौर्णिमेनिमित्त सम्राट अशोक बुद्ध विहार ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक अशी शांतता रॅली काढण्यात आली, ज्यात मोठ्या संख्येने उपासकांनी शुभ्र वस्त्र परिधान करून सहभाग घेतला. रॅली संपल्यानंतर त्रिसरण आणि पंचशील ग्रहण करण्यात आले. त्यानंतर, आयु प्रियंका विजयानंद बनसोडे (मुंबई) यांनी श्रीलंकन पद्धतीने विविध गाथांचे पठण केले आणि त्या गाथांचा अर्थ उपस्थितांना समजावून सांगितला, ज्यामुळे उपस्थितांना बुद्धांच्या शिकवणीची अधिक माहिती मिळाली. कार्यक्रमाच्या शेवटी सरनंतय घेऊन समारोप करण्यात आला. आयु बाबासाहेब माणिक किरवले यांनी याप्रसंगी खीरदान आणि फळदान केले. या कार्यक्रमामुळे सिरसाळ्यातील बौद्ध अनुयायांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शिरसाळ्यातील उपासक उपाशीकांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास सहभाग घेतला.

# वीस कोटीतच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची बोळवण

## वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवारांच्या राजीनाम्याची मागणी : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

अवकाळी पाऊस, कधी कोरडा तर कधी ओल्या दुष्काळामुळे नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकांचा कर्ज परतफेडीचा तगादा, मालाला हमीभाव नसणं या प्रमुख कारणांमुळे शेतकरी मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार १५ दिवसांच्या आत मदत मिळणे बंधनकारक असताना महिनोंमहिने शासनाने निधी उपलब्ध करून न दिल्याने मिळत नाही. वारंवार निवेदने आणि आंदोलने केल्यानंतर सरकारला जाग येते आणि सरकार तुटपुंज्या निधीची तरतूद करते. दि.१५ मे रोजी संपुर्ण राज्यासाठी केवळ २० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असुन या निधीतून प्रलंबित सर्व शेतकऱ्यांच्या वारसांना मदत मिळणे शक्यच नाही.

परीणामी शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीसाठी आणखी प्रतिक्षा करावी लागणार आहे. केवळ २० कोटीतच शासनाने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची बोळवण केल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक



कार्यकर्त्यांनी दिली वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार हे सोमवार रोजी बीड जिल्हा दौऱ्यावर असुन जिल्हा नियोजन समितीची बैठक प्रशासनातील विविध बाबींचा आढावा घेण्यासाठी येणार असुन शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात येणार असल्याचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, शेख युनुस, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, पांडुरंग हराळे आणि बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, उपाध्यक्ष इंटक संदिप झिंजुर्के यांनी तहसीलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय बीड अविनाश शिंगटे यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड यांना दिले आहे.

| विभागीय आयुक्त | वितरीत निधी |
|---|---|
| कोकण | १२ लाख |
| पुणे | १ कोटी ६ लाख |
| नाशिक. | ३ कोटी ३९ लाख |
| छत्रपती संभाजीनगर | ४ कोटी ९२ लाख |
| अमरावती | ६ कोटी ७६ लाख |
| नागपूर | ३ कोटी ७५ लाख |

एकुण २० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

### ६ विभागांसाठी केवळ २० कोटी

राज्यातील कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर या सहा विभागांसाठी केवळ २० कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे. मराठवाड्यात १ जानेवारी २०२५ ते मार्च २०२५ या ३ महिन्यात २६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. यात बीड जिल्हा ७१, लातुर १८, धाराशिव ३१, छत्रपती संभाजीनगर ५०, जालना १३, परभणी ३३, हिंगोली ३७ अशा एकुण २६९ शेतकरी आत्महत्यांची नोंद आहे.

बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२५ ते ३१ एप्रिल २०२५ या ४ महिन्यात ९२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यातील ५५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबिय मदतीच्या प्रतिक्षेत आहेत. दरम्यान छत्रपती संभाजीनगर विभागासाठी केवळ ४.९२ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे. या विभागात बीडसह ८ जिल्हे येतात.यातुन कोणत्या जिल्ह्याच्या वाट्याला किती येतात? यातुन सर्व शेतकरी कुटुंबियांना मदत मिळणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



# आष्टी एसटी महामंडळामध्ये पाच लालपरी दाखल

## दमदार आमदार सुरेश धस यांच्या मागणीला यश

आष्टी । प्रतिनिधी

राज्य मार्ग परिवहन महामंडळ आष्टी आगाराचे दररोजचे सात ते आठ लाख रुपये लाख उत्पन्न असूनही आष्टी आगारातील अर्ध्याहून अधिक बस दहा वर्षांच्या पुढच्या असून बस बसेस या वय संपलेल्या असूनही सेवेत आहेत. त्यामुळे नविन बस नसल्यामुळे लांब पल्ल्यांच्या बस सेवा सुरू करता येत नव्हत्या. त्यामुळे प्रवाशांची होणारी हेळसांड पाहता आ.सुरेश धस यांनी परिवहन मंत्री आणि महाव्यवस्थापक यांच्याकडे सतत पाठपुरावा त्यामुळे आष्टी आगाराच्या ताफ्यात पाच नवीन लाल परी बसेस आष्टी आगारात दाखल झाल्या आहेत. त्यामुळे आगाराचा नवीन ऊर्जा मिळणार आहे असे प्रतिपादन आष्टी नगरपंचायत चे नगराध्यक्ष जिया बेग यांनी केले.

आष्टी येथील परिवहन महामंडळ आगारामध्ये नवीन पाच लालपरी बसेस दाखल झाल्या आहेत. त्यांचे स्वागत करताना ते बोलत होते. यावेळी वाहतूक नियंत्रक हर्षद गुगळे मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेट चे उपाध्यक्ष गणेश नाना शिंदे, नगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, खंडू जाधव, अजित मुळे, नगरसेवक ज्ञानदेव राऊत, प्रवीण कदम, शमशोद्दीन, नगरसेवक सुरेश वारंगुळे, नगरसेवक श्याम वाल्हेकर, आष्टी तालुका पत्रकार संघ अध्यक्ष प्रविण पोकळे, पत्रकार शरद रेडेकर, पत्रकार रघुनाथ कर्डीले, पत्रकार गणेश दळवी, पत्रकार सचिन रानडे, आगार व्यवस्थापक चोथमल, वाहक सचिन काळे, मुख्तार तांबोळी, के.जी.गव्हाणे, राजेंद्र बांगर, रघुनाथ ससाणे, शरद झांबरे, बाबू कुरेशी आदी उपस्थित होते.

### गाड्यांचे आगमन आणि उत्साहात स्वागत

आष्टी आगारात आज दुपारपर्यंत बीएस–६ प्रकारच्या पाच नव्या गाड्या दाखल झाल्या असून, या गाड्यांच्या आगमनानंतर आष्टीकर नागरिक व प्रवाशांच्या वतीने नवीन लाल पऱ्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी या पाच ही लालपरींची आष्टी शहरातून फेरी आयोजित करण्यात आली.

पुढे बोलताना जिया बेग म्हणाले आमदार सुरेश धस यांनी आष्टीच्या आगाराकडे सतत लक्ष दिलेले आहे मध्यंतरी त्यांनी स्वखर्चातून टायर चेंज मशीन आगारासाठी भेट दिले आहे आता या नवीन बसेस आल्यामुळे लांब पल्ल्यांच्या प्रवासासाठी जाणाऱ्या प्रवाशांची हेळसांड थांबेल असा विश्वास व्यक्त केला. आष्टीच्या आगारातील निम्म्याहून अधिक बसेस जुन्या झाल्याने प्रवाशांचे हाल होत असल्याच्या तक्रारी येत असल्यामुळे आ.सुरेश धस यांनी परिवहन मंत्री, महाव्यवस्थापक या महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधल्यानंतर एसटी महामंडळाने तातडीने हालचाली सुरू केल्या आणि आष्टी आगारासाठी अत्याधुनिक अशा पाच नवीन बीएस–६ गाड्या आज गुरुवारी (१५ मे) दुपारी आगारात दाखल झाल्या. या पाच लाल परी बसेसच्या स्वागत करण्यात आले तर प्रवाशी चालक–वाहक व आगारातील कर्मचारी यांनी आ.सुरेश धस यांचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

# आम्ही दलित सरपंच असल्यामुळे अविश्वास ठराव आणला : शशिकला चंदनशिव

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील सावरगाव तालुका आष्टी येथे मागासवर्गीय आरक्षण सुटल्यामुळे सो भाग्यवती शिक्षकाला पंढरीनाथ चंदनशिव ह्या सरपंच झाल्या अडीच वर्षे त्यांनी निस्वार्थपणे सावरगाव जनतेची सेवा केली सावरगाव येथील मतदार राजाचे एक रुपये खाल्ला नाही किंवा कसलाच भ्रष्टाचार पण केला नाही आम्ही अहोरात्र काम करीत राहिलो तरी राजकीय दोष्यापोटी आम्ही दलित सरपंच असल्यामुळे आमच्यावर विश्वास ठराव आणला असे मत त्यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकाद्वारे व्यक्त केली आहे.

त्यापुढे म्हणाले की गावात जनतेला पाणीटंचाई भासू नये म्हणून जलजीवन सारखा प्रकल्प नवीन अंगणवाडी इमारत दलित वस्तीसाठी स्वतंत्र मशानभूमी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पेव्हीग ब्लॉक असे कामे करण्याचा मनापासून प्रयत्न केला परंतु ग्रामपंचायत सदस्यांनी आमचा फक्त सह्या घेण्यापुरताच फायदा घेतला सह्या करायच्या आणि काम त्यांनी करायचे त्यांनी तीही परस्पर करायची कारण आम्ही दलित सरपंच म्हणून दमदाटीने माझ्या सह्या घ्यायचे हे लोकशाही बसतं का आमचा अडीच वर्षाचा कार्यक्रम चांगल्या प्रकारे सांभाळला कधी कधी तर आमची लायकी सुद्धा काढली गेली अविश्वास ठराव संमत करताना मी अहमदनगर येथे उपचार घेत होते आणि इकडे अविश्वास ठराव संमत करण्यात आला.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या आरक्षणामुळे आम्ही सरपंच झालो हेच त्यांच्या पोटात दुखत होतं. ग्रामपंचायत मध्ये नऊ सदस्य ते त्यांचेच असल्याने ते एकत्र आले आणि आमच्यासारख्या दलित सरपंचावर अविश्वास ठराव आणून एक प्रकारे अन्याय केला आहे आम्ही सही करतांनी कधीच विचारलं नाही कोणता काम आहे परंतु त्याचा फायदा घेते त्यांनी कोट्यावधींची कामे करायची व मलिदा लाटायचं ही कोणती लोकशाही ग्रामपंचायत सदस्यांनी सहा तारखेला अविश्वास ठराव प्रस्ताव तहसीलदार यांना दिला नऊ तारखेला ग्रामपंचायत कार्यालय तो प्रस्ताव मिळाला आणि सर्व सदस्यांनी संगणमत करून आमच्यावर अविश्वास ठराव आणला त्यामुळे आता मी पुढील लढाई कायदेशीर मार्गाने लढणार असल्याचे त्यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# भारतीय सैन्याच्या शौर्याला सलाम करण्यासाठी परळीत तिरंगा रॅलीचे आयोजन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

भारतीय सैन्य दलाने ऑपरेशन सिदूर अंतर्गत पाकिस्तानला देत दाखवलेल्या अतुलनीय सलाम सौयॉला करण्यासाठी परळी येथे भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत सर्व परळीकरांनी उत्सवाने सहभागी व्हावे, असे आवाहन भाजप तालुका अध्यक्ष राजेश गीते यांनी केले आहे.



जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पीओके मधील दहशतवादी तळावर अचूक हल्ले करत शंभरहून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा केला. या अभूतपूर्व कारवाईने भारतीय सैन्याने देशाची मान उंचावली असून या सौयॉला सलीम करण्यासाठी देशभरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे.

१६ मे २०२५ गुरुवार होणारी तिरंगा रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरू होणार आहे. पुढे एक मिनार चौक स्टेशन रोड भवानीनगर राणी लक्ष्मी टावर मार्गे मोंढा मार्केट येथे समारोप होणार आहे. भारतीय सैन्याच्या पराक्रमामुळे प्रत्येक भारतीयाने मन अभिमानाने भरून गेले आहे. ही रॅली म्हणजे आपल्या जवानाच्या सॉरी याला मानवंदना देण्याचा आणि देशभक्तिची भावना जागृत करण्याचा एक प्रयत्न आहे सर्व परळीकरांना विशेषत: तरुणांनी आणि महिलांनी या रॅलीत सहभागी होऊन सर्व परळीकरांनी भारतीय सैन्य प्रति अभिमान व देश प्रेम व्यक्त करण्याचे आव्हान भाजप परळी वैजनाथ अध्यक्ष राजेश गीते यांनी केले आहे.

# भाजपा मंत्री विजय शहावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा : गणेश बजगुडे पाटील

बीड । प्रतिनिधी



ज्या पाकिस्तानी अतिरेक्यांनी काश्मिरच्या पहेलगाम भागात निष्पाप भारतीयांवर हल्ला केला त्यात अनेक निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमावावा लागला. त्याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंधूर राबवत कर्नल सोफिया कुरैशी व पायलट व्योमिका सिंह यांनी पाकिस्तानातील दहशतवाद्यादी तळावर हवाई हल्ले करून दहशतवाद्यांचे समुळ नष्ट केले. अशा जाबाज सैनिकांच्या पराक्रम, शौर्याचे संपुर्ण भारतवासी कौतुक करत असताना मध्ये प्रदेश सरकार मधील भाजपा मंत्री विजय शहा यांनी आम्ही अतिरेक्यांना मारायला त्यांचीच बहिण पाठवली म्हणत अतिशय बेताल व संतापजनक वक्तव्य करून भारतीय सैनिकांचा अवमान केलेला आहे.

कर्नल सोफिया कुरेशी या भारतीय असुन तमाम भारतीयांच्या त्या बहीण आहेत. परंतु त्या मुस्लिम आहेत म्हणुन त्यांना आतंकवादयाची बहीण म्हणणे हे अतिशय निंदनीय व खेदजनक आहे. या वक्तव्याचा बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत अश्याप्रकरे बेताल वक्तव्य करणाऱ्या भाजपा मंत्री विजय शहावर देश द्रोहाचा गुन्हा दाखल करुन मंत्री मंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी काँग्रेसचे नेते तथा शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष गणेश दादा बजगुडे यांनी केले आहे.



# खरीप हंगामासाठी दर्जेदार बियाणे खते उपलब्ध करून द्या : मोरे, खेडकर

शिरूर (का) । प्रतिनिधी

यावर्षी समाधानकारक पाऊस पडणार असल्याचे सांगितले जात असल्यामुळे पुरेसा पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांना पेरणीसाठी दर्जेदार बी बियाणे आणि योग्य दरात खते उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने नियमाचे काटेकोर पणे पालन करावे बँकेने शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेत वाटप करावे कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी सुशिक्षम नियोजन करावे शेतकऱ्यापर्यंतच्या बांधावर पोचून त्यांना मार्गदर्शन करावे असे सूचना काल शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी शिरूर कासार तालुक्यातील कृषी अधिकारी नेटके साहेब यांची भेट घेऊन चर्चा केली.

पुढे त्यांना शेतकऱ्यांच्या शेतीच्या हिताविषयी आपल्या तालुक्यासाठी बियाणे उपलब्ध व्हावेत म्हणून शिरूर स्टॉक रॅक पॉइंट करण्यासाठी आपण वरिष्ठांची चर्चा करणार असून खरीप हंगामात शेतकऱ्यांना वेळत व माफक दरात दर्जेदार खात बी बियाणे मिळतील याची खात्री करा यासाठी वेळोवेळी निष्ठावंत यांची तपासणी करा सांगत शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख म्हणाले ऊस ज्वारी सोयाबीन भुईमूग व कडधान्य पिकांसाठी खरीप हंगामात पाउस चांगला होईल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे परंतु पाऊस कमी झाला तरी उत्पादन वाढीसाठी सुसक्षम निवेजन करा शिरूर कासार तालुक्यातील सर्व शेतकऱ्यापर्यंत पोचून त्यांना आवश्यकता तसे सहकार्य करा.

पुढे शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे बोलले. दि.२०, २५, २६ मध्ये पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करा शिरूर कासार तालुक्यातील शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनेची माहिती देऊन शासकीय योजनेचा लाभ विमा सुरक्षा मिळवून द्या तसेच पीक कर्ज मुदतीत वितरित करा पुढे शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेस शेतकऱ्यांची संबंधित सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढा शेतकऱ्यांना विम्याची रक्कम व कर्जवाटप मुदतीत करा शेतकऱ्यांना मशागत व पेरणी पूर्वी मार्गदर्शन करा जमिनीत सुधारणा होण्यासाठी तसेच या जमिनीची उपयुक्तता वाढवण्यासाठी उपयोजनांवर भर द्या.

शिरूर कासार तालुक्यातील रेशमी उत्पादकात वाढवण्यासाठी सुसक्षम नियोजन करून त्यानुसार अंमलबजावणी करा अशी सूचना काल कृषी अधिकारी साहेबांना भेटून शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी दिल्या आहेत आज शेतकऱ्यांच्या पीक कर्जाबाबत शिरूर तालुक्यातील बँकांना देखील भेट देणार आहोत.



मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या बलभीम कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड येथे प्राचार्य पदी मा.प्रो.डॉ.संतोष उंदरे सर यांची निवड झाल्याबद्दल यावेळी सत्कार करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी युवा पत्रकार अंकुश गवळी, शैलेश डोंगरदिवे, विशाल सरवदे, सतीश हटोटे, दिनेश भुतपाले आदी उपस्थित होते.

# पोलीस इमारती बांधणाऱ्या गुत्तेदारावर तात्काळ गुन्हे दाखल करा : रविंद्र शिनगारे

बीड । प्रतिनिधी

येथील पोलीस कुटुंबासाठी बांधण्यात आलेल्या इमारती ह्या निष्कृष्ट दर्जाच्या असून पोलीस कुटुंबाच्या जीवाशी खेळ करणाऱ्या गुत्तेदारावरती तात्काळ गुन्हे दाखल करावे, एकूण इमारतीमध्ये जवळपास ४०० फ्लॅट तयार करण्यात आले असून २४ तास जनतेची सेवा करणारा पोलीस कर्मचारी व त्याचे कुटुंब सुरक्षित नाहीत. सोमवारी पहिल्याच झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने लावलेल्या हजेरीत खिडक्या, दारे जर हवेने पडत असतील तर त्या कामाचा दर्जा किती आहे हे दिसून येत आहे. एक तर अगोदर तिथे कसल्या प्रकारची व्यवस्था नाही फक्त इमारती बांधून मोकळे झाले पिण्याची पाण्याची व्यवस्था नाही. हवे न पडलेल्या काचामुळे पोलीस कुटुंबा जखमी झाले. त्यामध्ये लहान मुलांचा देखील समावेश असून जर मोठ्या प्रमाणावर चक्रीवादळ आणि पाऊस आला तर इमारती जमीनदस्त होण्यास वेळ लागणार नाही. लवकरच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांना भेटून गुत्तेदारावर गुन्हा दाखल करण्याबाबत चर्चा करणार आहोत. तसेच पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली बारामती पॅटर्न पोलीस इमारती नव्याने निर्माण बीडमध्येच नाहीतर राज्यामध्ये राबवण्याबाबतची मागणी पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्रराज्याच्या वतीने लवकरच करण्यात येणार आहे, असे जाहीर प्रसिद्धीपत्रकाद्वारे पोलीस बॉईज असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र शिनगारे यांनी केली आहे.



# माजी सैनिकांचा सन्मान करुन रणवीर पंडित यांचा वाढदिवस साजरा होणार

गेवराई । प्रतिनिधी

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय सैन्य दलातुन निवृत झालेल्या माजी सैनिकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. माजी सैनिकांचा सन्मान करुन रणवीर पंडित यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा होणार असल्यामुळे तरुणांमध्ये या निमित्ताने राष्ट्रप्रेम जागृत करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.



शनिवार दि.१७ मे रोजी सकाळी ११ वाजता गेवराई शहरातील कृष्णाई निवासस्थानी मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी निवृत सुभेदार कॅप्टन रामकृष्ण चेडे, डॉ. मयुर सोनवणे, बळीराम गवते, अजिंक्य आनेराव यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रक्तदान शिबीर, पेढे तुला, सामान्य ज्ञान स्पर्धा आदी समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी युवकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीच्या माध्यमातुन करण्यात आले आहे.

गेवराई तालुक्यातील माजी सैनिकांचा भव्य सन्मान करुन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर अमरसिंह पंडित यांचा आगळावेगळा वाढदिवस साजरा होणार आहे. पहलगाम घटनेनंतर भारतीय सैन्याने केलेल्या कामगिरीचा प्रत्येक भारतीयांना अभिमान असुन भारतीय सैन्य दलातील जवानांप्रती आदरभाव निर्माण झाला आहे. या पार्श्वभुमीवर माजी सैनिकांचा सन्मान करुन वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय शारदा स्पोर्ट्स अकॅडमी व रणवीर पंडित मित्र मंडळाने घेतला आहे. शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी ११ वा. गेवराई शहरातील कृष्णाई निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी निवृत सुभेदार कॅप्टन रामकृष्ण चेडे, छत्रपती संभाजीनगर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष डॉ. मयुर सोनवणे, बीड पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम गवते, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अजिंक्य आनेराव यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात गेवराई तालुक्यातील माजी सैनिकांचा सन्मान केला जाणार आहे. कृष्णाई येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. मौजे मादळमोही येथे जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजेंद्र वारंगे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातुन शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी १० वा. रणवीर पंडित यांची भव्य पेढेतुला होणार आहे. गेवराई शहरातील मोहसिन शेख यांच्या पुढाकारातुन भव्य सामान्य ज्ञान स्पर्धा आणि सायंकाळी गेवराई शहरात वाढदिवसानिमित्त ठिक–ठिकाणी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आलेले आहे. कृष्णाई येथे आयोजित केलेल्या माजी सैनिकांच्या सन्मान सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी सुरज लोखंडे यांना लोकांची पसंती

बीड । प्रतिनिधी



आनेक वर्षापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ४ महिन्यात होणार असी घोषणा होताच लोकांचा कल पंचक्रोशीतच नव्हे तर तालुका आणि जिल्ह्यात नावलैकिक असलेलं नाव सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये सक्रिय सर्वसामान्यांच्या आडी–आडचणींना धाऊन जाणारे सातत्याने चळवळीतील रस्त्यावरची लढाई धाढणारे नाव सुरज(भाऊ)लोखंडे यांनी २०२५ च्या बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरवा आसा आहे. त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कामाची पावती म्हणून पंचक्रोशीतील लोकांमध्ये सुरज(भाऊ) लोखंडे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढवावी आसी चर्चा जोरधरू लागली आहे.

सुरज लोखंडे हे आपल्या सुरज (भाऊ) लोखंडे युवा मंच च्या माध्यमातून आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसोबत सर्व सामन्यांच्या न्याय हक्कासाठी पुढाकार घेऊन काम करत आसल्यामुळे सुरज(भाऊ) लोखंडे यांचे नाव सातत्याने चर्चेत असते. सुरज लोखंडे यांचे सहकारी आणि कार्येकर्त्ये मोठ्या ताकतीने कामाला लागणार असल्याचे चित्र पाहायला मिळत असल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये होत आहे. युवा, तरुण, तडपदार, कर्तृत्वान, कार्यशील आसलेले सुरज (भाऊ) लोखंडे हे या पंचक्रोशीचा / सर्कलचा विकास करतील अशी आशा लोकांना लागली आसल्याची चर्चा होत असताना दिसुन येत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT